# खरिपातील चारा पिकांची लागवड



प्रा. संजय बडे
(मो.नं. ७८८८२९७८५९)
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय,
दहेगाव, ता. वैजापूर,
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)

दुभत्या जनावरांना वर्षभर समतोल चारा उपलब्ध असणे ही यशस्वी दुग्धोत्पादनाची पहिली पायरी आहे. संमिश्र चारा उत्पादन हे जनावरांच्या समतोल आहाराच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. ते साध्य करण्यासाठी एकदल व व्दिदल चारा पिके घ्यावीत. एकदल व व्दिदल चाऱ्याचे प्रमाण निम्मे निम्मे असावे.

**चारा पिकांची लागवड :** भरपूर व उत्कृष्ट प्रतीचा चारा सातत्याने मिळविण्यासाठी धान्य पिकांप्रमाणेच चारा पीक लागवडीचे नियोजन करावे. योग्य पिकाची निवड, जमिनीची निवड, पूर्वमशागत, योग्य वाणांची निवड, खत व पाणी व्यवस्थापन या गोष्टी विचारात घेऊन चारा पिकांची लागवड करावी.

**चारा पिकांचे वर्गीकरण**

अ) एकदल चारा पिके : ज्वारी, मका, बाजरी, ओट, अनेक प्रकारची गवते इत्यादी.

ब) व्दिदल चारा पिके : चवळी, लसूणघास, सुबाभूळ, स्टायलो इत्यादी.

क) गवतवर्गीय चारा पिके : गजराज, मारवेल, अंजन, पॅराग्रास वगैरे.





**अधिक उत्पादन देणाऱ्या चारा पिकांचे सुधारित वाण**

| अ. क्र. | चारा पिकाचे नाव | सुधारित वाण |
|---|---|---|
| १ | ज्वारी | रूचिरा, मालदांडी, फुले अमृता, निळवा, एमपी चारी, पुसा चारी, एसएसबी-५९-३ |
| २ | जायंट बाजरा | जायंट बाजरा, राजको बाजरा, |
| ३ | मका | आफ्रिकन टॉल, मांजरी कंपोझिट, विजय, गंगा सफेद-२ |
| ४ | संकरित नेपिअर | गजराज, फुले यशवंत, फुले जयवंत |
| ५ | चवळी | श्वेता, ईसी-४२१६, बंदेल लोबिया |
| ६ | स्टायलो | स्टायलो हॅमटा, फुले क्रांती, |
| ७ | मारवेल | मारवेल-८, मारवेल-४० |

## काही चारा पिकांची लागवड, खतनियोजन आणि कापणीचे वेळापत्रक

| चारा पिकाचे नाव | ज्वारी | जायंट बाजरा |
|---|---|---|
| जमीन | मध्यम ते भारी | हलकी ते मध्यम |
| पूर्वमशागत | एक नांगरट व दोन तीन वेळा वखरणी | एक नांगरट व दोन वेळा वखरणी |
| पेरणीची वेळ | खरीप- जून- जुलै | खरीप- जून- ऑगस्ट |
| बियाणे प्रमाण | २० किलो प्रतिहेक्टरी | १० किलो प्रतिहेक्टरी |
| पेरणीचे अंतर | ३० x ४५ से.मी. | ३० x ४५ से.मी. |
| खतमात्रा/ हेक्टरी | १० टण शेणखत प्रतिहेक्टरी, १०० कि.नत्र, ५० कि. स्फुरद व ४० कि. पालाश | १० टन शेणखत प्रतिहेक्टरी, ९० कि.नत्र, ४० कि. स्फुरद व ३० कि. पालाश द्यावे |
| कापणी | ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना ६५ ते ७० दिवसांनी करावी | ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना ५५ ते ६० दिवसांनी करावी |
| हेक्टरी उत्पादन | ४५० ते ५०० क्विंटल/ हेक्टरी | ४५० ते ५०० क्विंटल/ हेक्टरी |
| पोषणमूल्ये | प्रथिने ७.८ टक्के | प्रथिने ७ ते ९टक्के |
| **चारा पिकाचे नाव** | **मका** | **संकरित नेपिअर** |
| जमीन | मध्यम ते भारी | मध्यम ते भारी |
| पूर्वमशागत | एक नांगरट व दोन तीन वेळा वखरणी | एक नांगरट व दोन तीन वेळा वखरणी |
| पेरणीची वेळ | खरीप- जून- ऑगस्ट | खरीप- जून- ऑगस्ट |
| बियाणे प्रमाण | ७५ किलो प्रतिहेक्टरी | २५ हजार ठोंब प्रतिहेक्टरी (एका ठिकाणी २ ठोंब लावणे) |
| पेरणीचे अंतर | ३० x ४५ से.मी. | ९० x ६० सें.मी. |
| खतमात्रा/ हेक्टरी | १० टन शेणखत प्रतिहेक्टरी, ५० कि. नत्र, ५० कि. स्फुरद व ५० कि. पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. | २० टन शेणखत प्रतिहेक्टरी, ५० कि. नत्र, ४० कि. स्फुरद व २० कि. पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. प्रत्येक कापणीनंतर २५ किलो नत्र द्यावे |
| कापणी | ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना ६५ ते ७० दिवसांनी करावी | पहिली कापणी ६५ ते ७० दिवसांनी व नंतरची ४० ते ४५ दिवसांनी करावी |
| हेक्टरी उत्पादन | ५०० ते ६०० क्विंटल/ हेक्टरी | १२०० ते १५०० क्विंटल/ हेक्टरी |
| पोषणमूल्ये | प्रथिने ९ टक्के | प्रथिने ९ ते १० टक्के |
| **चारा पिकाचे नाव** | **स्टायलो** | **मारवेल** |
| जमीन | मध्यम ते हलकी | हलकी ते मध्यम, भारी, कसदार |
| पूर्व मशागत | एक नांगरट व दोन तीन वेळा वखरणी | एक नांगरट व दोन तीन वेळा वखरणी |
| पेरणीची वेळ | खरीप- जून- ऑगस्ट | खरीप- जून - ऑगस्ट |
| बियाणे प्रमाण | १० किलो प्रतिहेक्टरी | ७५ हजार कांडे प्रतिहेक्टरी |
| पेरणीचे अंतर | ३० सें.मी. ओळीत | ४५ x ३० सें.मी. |
| खतमात्रा/ हेक्टरी | १० टन शेण खत प्रतिहेक्टरी, २० कि. नत्र, ४० कि. स्फुरद व ६० कि. पालाश द्यावे | १० टन शेणखत प्रतिहेक्टरी, ६० कि.नत्र, ४० कि. स्फुरद व २० कि. पालाश द्यावे |
| कापणी | पहिली कापणी ४५ दिवसांनी व नंतरची ३० दिवसांनी करावी. चार ते पाच कापण्या प्रतिवर्ष मिळतात. | पहिली कापणी ६० ते ६५ दिवसांनी व नंतरची कापणी ४० ते ४५ दिवसांनी करावी. सात ते आठ कापण्या प्रतिवर्ष मिळतात. |
| हेक्टरी उत्पादन | २५० ते ३५० क्विंटल/ हेक्टरी | ६० ते ७० टन/ हेक्टरी |
| पोषणमूल्ये | प्रथिने १२ ते १४ टक्के | ६.५ टक्के प्रथिने |